**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.11 No.2** **November – December 2023**

# मराठी ग्रामीण कादंबरी आणि जागतिकीकरण

**श्री.रामदास माधवराज भालेराव[1], डॉ.प्रतिभा शंकर घाग-सोनी[2]**

*[1]पीएचडी रिसर्च स्कॉलर, मराठी विभाग, श्री जेजेटी युनिव्हर्सिटी राजस्थान, भारत[1]*

*[2]प्राध्यापक आणि संशोधन मार्गदर्शक, श्री जेजेटी युनिव्हर्सिटी राजस्थान, भारत[2]*

***Corresponding Author - श्री.रामदास माधवराज भालेराव***

**DOI - 10.5281/zenodo.10656138**

**गोषवारा:**

*मराठी ग्रामीण कादंबरी ("ग्रामीण कादंबरी") आणि जागतिकीकरण यांच्यातील संबंध स्थानिक कथा आणि जागतिक प्रभाव यांच्यातील गतिशील परस्परसंबंध प्रतिबिंबित करतात. हा अभ्यास जागतिकीकरणाच्या संदर्भात ग्रामीण कादंबऱ्यांचे महत्त्व शोधून काढतो, या साहित्यकृतींनी ग्रामीण जीवनावरील जागतिक बदलांचा परिवर्तनात्मक प्रभाव कसा पकडला आहे हे शोधून काढले आहे. कथन कृषी क्षेत्रापासून औद्योगिकीकरण, तांत्रिक प्रगती आणि सामाजिक-आर्थिक बदलांमुळे उद्भवलेल्या गुंतागुंतांकडे बदलते. ग्रामीण कादंबरींमधील सामाजिक गतिशीलता, आर्थिक संरचना आणि सांस्कृतिक स्थित्यंतरे यासारख्या विविध विषयांचे परीक्षण करून, हा अभ्यास जागतिकीकरणाच्या शक्तींमध्ये ग्रामीण जीवनाचे सूक्ष्म चित्रण अधोरेखित करतो. मराठी ग्रामीण कादंबऱ्यांची त्यांच्या सुरुवातीच्या ऐतिहासिक मुळापासून त्यांच्या सद्यस्थितीपर्यंतची उत्क्रांती ही एक भिंग बनते ज्याद्वारे ग्रामीण समाजाच्या बदलत्या पैलूंचे विश्लेषण केले जाते. कृषी संकट, औद्योगीकरणाचा उदय आणि तंत्रज्ञानाच्या आगमनानंतरचे चित्रण करून ग्रामीण कथानकाला आकार देण्यामध्ये जागतिकीकरणाची भूमिका अधोरेखित करते. हे ग्रामीण समुदायांसमोरील आव्हानांचे चित्रण करण्याच्या कादंबरीकारांच्या क्षमतेवर तसेच जागतिक बदलांशी जुळवून घेण्याच्या त्यांच्या लवचिकतेवर जोर देते. शिवाय, जागतिकीकरणाने कृषी क्षेत्रावर कसा प्रभाव टाकला आहे, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि जीवनशैलीवर कसा प्रभाव पाडला आहे याचा शोध घेतो.*

*शेवटी, मराठी ग्रामीण कादंबऱ्या स्थानिक ओळख आणि जागतिक प्रभाव यांच्यातील संवादाचा एक अनोखा दृष्टीकोन देतात. कथन केवळ सामाजिक-आर्थिक बदलच टिपत नाही तर ग्रामीण समुदायांमधील सांस्कृतिक बदलांचे प्रतिबिंब म्हणूनही काम करतात. प्रादेशिक साहित्यावरील जागतिकीकरणाच्या प्रभावावर व्यापक प्रवचनात योगदान देणे, जागतिक परिवर्तनांच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण जीवनाची अनुकूलता आणि सहनशीलता यावर भर देण्याचे या अभ्यासाचे उद्दिष्ट आहे.*

***मुख्यशब्द: मराठी ग्रामीण कादंबऱ्या,जागतिकीकरण,ग्रामीण जीवन,कृषी पद्धती,आर्थिक परिवर्तन,सामाजिक गतिशीलता***

**प्रस्तावना:**

जागतिकीकरण हे नाव आज नवीन राहिलेले नाही. जागतिकीकरणाची प्रक्रिया फार जुनी आहे. याचे दाखले इतिहासात ठिकठिकाणी सापडतात. आपल्या उत्पादित वस्तूला जगभर मागणी मिळावी यातून मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार

केला गेला. त्यामुळे सर्व जग जवळ आले. या प्रक्रियेतून जागतिकीकरण ही संकल्पना उदयास आली. ही संकल्पना सामान्यतः अर्थशास्त्रीय असली तरी ती संपूर्ण मानवी समाजजीवनावर परिणाम करणारी ठरली आहे. याचा परिणाम चांगला व वाईट या दोन्ही बाजूने झाला आहे. जागतिकीकरण ही नैसर्गिक घटना नसून मानवनिर्मित, कृत्रिम घटना आहे. या घटनेने वर्तमानकाल प्रचंड प्रभावित झाला आहे. जागतिकीकरणाने नव्या वसाहतवादी संस्कृतीला जन्माला घातले. त्यामुळे मानवी जीवनात एकाकीपणा व असुरक्षितता निर्माण झाली. या विचारसरणीने माणसाचा माणसावरचा विश्वास उडाला. तो आता माणसाऐवजी यंत्रात रमू लागला. रंगनाथ पठारे यांच्या शब्दात जागतिकीकरणाने माणसाचा चेहरा हिरावून घेतला. त्याला अमानवीय केले. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून नव भांडवलदार देश जागतिक स्तरावर उदयास आले. प्रबळता हेच सत्तेचे केंद्र बनले. या भांडवलदार देशांना सर्व जग आपल्या साम्राज्याखाली घेऊन सत्ता गाजवायची आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भांडवलाला केंद्रबिंदू बनविण्यात गॅट/WTO/जागतिक बँक/आंतरराष्ट्रीय नाणे निधी/ उत्तर अमेरिका मुक्त व्यापार करार या संस्था प्रयत्नरत आहेत. १९९१ साली परकीय चलनाची गंगाजळी संपुष्टात आल्यावर भारताने विश्व बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्याकडे मदतीसाठी हात पसरले. या मदतीच्या मोबदल्यात गॅट करारावर भारताला स्वाक्षरी करावी लागली व त्याद्वारे जागतिक आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या योजनेला बळी पडावे लागून आंतरराष्ट्रीय बाजाराच्या अटी-नियमांची गुलामगिरी स्विकारावी लागली. त्यातून राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यायाने मानसिक गुलामगिरीची ही प्रक्रिया सुरु झाली. एक प्रकारे विश्व बँक, विश्व नाणेनिधी, विश्व व्यापार संघटना या जागतिक वित्त आणि व्यापार संस्थांचे आपण दास झालो.

विश्व व्यापार संघटना (WTO) ही अत्यंत किचकट कायदे असलेली व्यवस्था असून त्यामध्ये ६० करार आहेत. त्यातला एक करार कृषी विषयक करार आहे. यामध्ये कोणत्याही सहभागी राष्ट्राला कृषी उत्पादनाची किंवा पदार्थाची आयात ही बंद करता येणार नाही. सगळं आयात करावं लागेल. गरज असेल तेवढेच आयात करणे हे WTO खाली निषिध्द ठरविण्यात आले. दुसरा मुद्दा हा आयात कराराविषयीचा आहे. अमेरिका, पश्चिम युरोप, जपान हे विकसीत देश WTO चे धोरण ठरविणारे असून ते या ना त्यामार्गाने आपली निर्यात रोखतात (स्वच्छता, शुचिता, निरामयता या बाबतीतील करारानुसार) परंतू आपण मात्र त्यांच्याविरुध्द काहीही करु शकत नाही. या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला की येथील Win शेतकरी आत्महत्या करायला लागला.

मराठी कादंबरीचा सुरूवातीचा काळ हा भाषांतरीत कादंबरीचा काळ मानला जातो. या काळामध्ये पाश्चिमात्य भाषेतील अनेक सुप्रसिद्ध कादंबऱ्यांची भाषांतरे झाली आणि याची ओळख मराठी साहित्याला होऊ लागली. कादंबरी या

साहित्य प्रकाराचा प्रथमतः विकास झाला तो पाश्चिमात्य देशामध्ये. तिकडून तो भाषांतराच्यामार्फत आपल्याकडे आला. १८ व्या शतकात कादंबरी हा साहित्य प्रकार उत्क्रांत झाला आणि १९ व्या शतकाच्या आरंभी तो मान्यताप्राप्त झाला. कादंबरी या साहित्य प्रकाराचे त्याच्या प्रकृती धर्मानुसार विविध प्रकार पडतात. यामध्ये सामाजिक कादंबरी, राजकीय कादंबरी, ऐतिहासिक कादंबरी, पौराणिक कादंबरी, ग्रामीण कादंबरी असे प्रकार दिसून येतात. १९६० नंतर ग्रामीण मराठी समाजजीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचा ग्रामीण कादंबरी म्हणून उल्लेख केला जातो. तत्पूर्वी हे या वेगळ्या नावाने ओळखले जात नव्हते असे नाही. मात्र १९६० नंतर ग्रामीण साहित्य लेखनाला चौफेर अंगांनी गती प्राप्त झाली. अनेक कादंबऱ्यांना प्रसिद्धी लाभली. दुर्लक्षित झालेल्या ग्रामीण समाजजीवनाचे प्रत्ययकारी चित्रण होऊ लागले. अनेक कादंबऱ्या प्रसिद्धीला आल्या. लेखकाला प्रतिष्ठा प्राप्त झाली. अनेक मानसन्मान मिळाले. आजही त्याची वाटचाल चालूच आहे, पण तत्पूर्वीच्या परिस्थितीचा आढावा या प्रकरणामध्ये काही मुद्यांच्या आधारे स्पष्ट करावयाचा आहे. ग्रामीणता, ग्रामीण संवेदनशीलता, ग्रामीण साहित्याची प्रेरणा, ग्रामीण कादंबरीची वाटचाल या काही मुद्यांच्या आधारे अभ्यासू. भारतीय साहित्याच्या संदर्भात १९ वे शतक फलदायी ठरले. या शतकात आधुनिक भारताचा जन्म झाला. वेगवेगळ्या बदलाबरोबरच सर्वांगीण परिवर्तनातून समाजजीवनात बदल घडून आला आणि या परिस्थितीमध्ये ग्रामीण कादंबरी उदयाला आली. आणि आजही ती विकास पावत आहे.

**जागतिकीकरणाचा ग्रामीण जीवनावरील परिणाम:**

भारतीय भूमीत खाऊजा धोरणाची बोजे रोवली गेली त्याचा परिणाम ग्रामीण जीवनावरही झाला आहे शेती हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा भाग आहे शेती आणि शेतकरी कृषी व्यवस्थेचा प्रमुख घटक असूनही भांडवली व्यवस्था त्याला निर्णय व्यवस्थेच्या परिघा बाहेर ठेवले आहे औद्योगिकरणाने गावचा आर्थिक विकास बदलला. यंत्र युगाचा शेतीत शिरकाव झाला शेत गडाची भाकरी ट्रॅक्टर ड्रायव्हरने पळवली शेतात ट्रॅक्टर सुरू झाले आणि बैल बसला शेण खताची जागा महागड्या रासायनिक खताने घेतली. संकरित बी बियाणांनी उत्पादन वाढवले अन्नधान्याची तोड भरून निघण्यास मदत झाली परंतु त्यातील सकसपणा नष्ट झाल्या व्यापारी दलालांचे संगणमत धान्याला मिळणारा अल्पभाव शासनाची उदासीनता, नापिकी दुष्काळ, पूर, वादळ अशा अनेक संकटाबरोबरच वैभव वंशाचे उत्पन्न या चक्रव्यूहात शेतकरी उध्वस्त होत आहे. लेखक समाज सुधारक तज्ञ शेतकरी समितीने शोषणाच्या वाटा उघड केल्या त्यावर उपाय सांगितले परंतु शोषणाची ही प्रक्रिया न थांबता अनेक मार्गाने गतिमान झालेली दिसते दुसरीकडे ग्लोबल व्हिलेज या गोंडस नावाखाली खेड्यांच्या उध्वस्थीकरणाला अधिक वेग आला प्रारंभी यांत्रिक कारणाने काहीसे

मुखावणारे जीवन जागतिकीकरणाच्या सपाटीकरणाखाली भरडले गेले उच्च शिक्षण ग्रामीण भागात आलं गावातली मुलं पदवीधर झाली पदव्या घेऊन नोकरीसाठी भटकंती सुरू झाली परंतु कायमस्वरूपी नोकरीचे स्वप्न बंगले विनाअनुदान तासिका तत्त्वावर नेमणुका झाल्या कंत्राटी पद्धत आली सोबत वाढली महागाई त्यात भ्रष्टाचाराची लागण अर्ध पोटी ठेवणारी नोकरी परवडे ना झाली जगण्याचे प्रश्न सोडविण्यासाठी बेरोजगार पावलं वाईट मार्गाकडे वळू लागली टीव्ही चित्रपटगृहे मोबाईल हॉटेल ढाबा संस्कृती मटका जुगार अशा अनेक नव्या गोष्टींनी ग्रामीण जीवनाचा दृष्टिकोन बदलला चंगळवादी भोगवादी सुखललो प्रवृत्तीने ग्रामीण मनाचा कब्जा घेतला केशभूषा पासून ते खानपानाच्या पद्धती पर्यंत ठळक बदल झाले.

जागतिकी करणारी कुटुंब व एकूणच मानवी नातेसंबंधावर खोलवर प्रहार केला माणूस अधिक व्यावहारी बनला माणसाला ग्राहक कात रूपांतरित केले पैसा आणि सत्याने शोषणाची एक नवीन व्यवस्था जन्माला घातली या नव्या शोषण व्यवस्थेने श्री चा परी घेतला श्रीचे सौंदर्यतीचे अवयव आणि मातृत्व ही बाजारात मांडले गेले नातेगोती आपलेपणा जिव्हाळा नैतिकता मानवता चांगुलपणा यांना मातीत गाढवून पैशाला अधिक महत्त्व दिले गेले पैसा माणसापेक्षा त्याच्या कर्तृत्वापेक्षा श्रेष्ठ ठरवला गेला.

**मराठी ग्रामीण कादंबरीतील जागतिकीकरणाचे स्वरूप:**

जागतिकीकरणाच्या भस्मासुलामुळे भारतीय समाज जीवन कमालीचे प्रभावीत झाली आहे या प्रभावातून ग्रामीण साहित्य सुटले नाही वर्तमानपत्रात जागतिकीकरण शेताच्या बांधापर्यंत आले आहे ग्रामीण समाज जीवन व संस्कृतीचे सर्वांगीण घडवणारा साहित्य प्रकार म्हणून ग्रामीण कादंबरीकडे पाहिले जाते खाऊजा कुटुंबातील समस्या इच्छा आकांक्षा जगण्याची कसरत वाढत चालले भूक दैन्य दारिद्र्य अवहेलना अशा अनेक विविध दर्शन घडविणाऱ्या ग्रामीण कादंबरी या जागतिकीकरणाचे देणे म्हणून बारोमास तहान अगर पांगुळ वाडा आधी मराठी ग्रामीण कादंबरीच्या आधारे जागतिकीकरणाचे स्वरूप तपासायचे आहे.

जागतिकीकरणाचे भयावर स्वरूप स्पष्ट करणारे सदानंद देशमुख यांची साहित्य अकादमी पुरस्कृत 'बारोमास' (२००२) ही कादंबरी आहे, ज्यात जागतिकीकरणाचा शेती व्यवसायावर काय परिणाम झाला? शेतकऱ्याची नवी पिढी शेती व्यवसायावर उदासीन का आहे? शेतकरी कुटूंबातील नव्या व जुन्या पिढीचा संघर्ष का आहे? शेती व्यवसायातील यश-अपयश अशा अनेक घटकांवर त्यात चर्चा केली गेली आहे. "शेतकऱ्याच्या हिताचे धोरणच नाईत, आता मुक्त अर्थव्यवस्था आली. तिले आपला इरोध नाही, आपुन कोन इरोध करणार, झिंजोलडे ? उलट ज्ञानेश्वर म्हणत असं हे विश्वचि माझं घर होऊ द्या, माणसाले माणसानं खायाची नियम नाई ठेवू. पण ही हायजते नाई आयात कराव, पण तो अधिच महापूर हाये त्याची आयात कशाले? शेतकऱ्याले मातीत

घालाले" कृषीजीवन जगणाऱ्या या मातीवरच्या माणसांनाच आज जगणे असहय झाले आहे. शेतकऱ्याच्या मुलांना शेतीविषयी घृणा वाटायला लागली आहे. शेतीत मरमर कष्ट करुनही हाती काहीच येत नाही. त्यामुळे 'शेतकऱ्याच्या मुलास मुलगी कुणी द्यावी? त्यापेक्षा चपराशी शंभरपट बरा' अशी विदारक परिस्थिती समाजात निर्माण झाली आहे. अशा सगळया खळबळजनक वातावरणाचा वेध प्रस्तुत कादंबरीत कादंबरीकारांनी घेतला आहे.

'तहान' या कादंबरीत सदानंद देशमुख यांनी पाणी प्रश्नाची समस्या मांडली आहे. ग्रामीण भागातील पाणी टंचाईसारख्या मूलभूत समस्याविषयी असलेली राजकीय अनास्था, शासकीय योजनांचा नोकरशाहीकडून उडणारा बोजवारा आणि अश्या योजनांत ही आपापले हितसंबंध जोपासणाऱ्या प्रवृत्तीचे चित्रण या कादंबरीत बघावयास मिळते. कृषी संस्कृतीत ताक, दही, दूध सुध्दा फुकट वाटलं जायचं तिथे पाणी विकणे ही गोष्ट अस्वस्थ करणारी आहे. हा आजच्या बदलत्या बाजारु संस्कृतीचा परिणाम आहे. परंतू पाण्याचा पैसा पाण्यात या ग्रामीण म्हणीप्रमाणे हा धंदा शेवटी बरकत देण्यापेक्षा शोकांतिकाच उभी करतो.

जागतिकीकरण - खाजगीकरणाच्या या पर्वात भांडवली औद्योगिक प्रकल्पांसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी सक्रिय सरकारी कारवाईने ताब्यात घेऊन त्या भांडवलदारांच्या घशात घालण्याची लाट आली आहे. त्या विरोधात भुमिपुत्रांची आंदोलने होताहेत. या ज्वलंत सामाजिक प्रश्नावर शंकर सखाराम यांनी एसई झेड ही कादंबरी लिहिली असून ही सेझच्या विविध अंगावर प्रकाश टाकते लेखक स्वतः सेझग्रस्त असल्याने या महाकाय जटिल प्रश्नाचे बारकावे, अनेकविध पैलू, आंदोलने वगैरेचे स्वानुभवाने लेखन केले आहे. भांडवली आर्थिक, राजकीय व्यवस्थेविरुध्द भूमिपुत्रांचा हा न्याय्य लढा शोषक शोषितांमधील अस्तित्वाच्या संघर्षाचे तीव्र रुप धारण करतो. माणसाच्या भूमिनिष्ठ सहजीवनाच्या मूलभूत मानवाधिकाराचा प्रश्न तीव्रपणे मुखर करतो.

१९९१ नंतरच्या बदलत्या ग्रामीण कादंबरीमध्ये विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' ही एक महत्वाची कादंबरी आहे. धरण ग्रस्तांच्या जीवनामरणाशी संबंधित असलेल्या पुनर्वसनाच्या प्रश्नाशी खोलवर जाऊन भिडलेल्या या कादंबरीत धरणग्रस्तांच्या पुनर्वसन कार्यक्रमात त्यांचे अतोनात शोषण समाजाच्या सर्वच पातळयांवरुन कसे होत जाते याचे अत्यंत शोकात्म चित्रण आलेले आहे. ज्यांच्या भरवशावर विकास साधायचा आहे त्यास विकासाचे वाटेकरी करता आले पाहिजे. जर असे होत नसेल आणि विकासाच्या नावावर त्यांची झाडाझडती करुन जगण्याचे हक्क हिरावून घेतले जात असतील तर असा विकास करायचा कशासाठी? अशा प्रश्न या कादंबरीने समाजासमोर उभा केला आहे.

रविंद्र शोभणे यांची 'कोंडी' (१९९२) ही कादंबरी वेगळया धाटणीची आहे. या कादंबरीत नरखेड तालुक्यातील 'खरसोली' या गावचे कथानक पाहावयास मिळते पण यासोबतच ही कादंबरी

नागपुरसारख्या महानगराचेही दर्शन घडविले. या कादंबरीत गणपत व कौसी या ग्रामीण कष्टकऱ्यांचे दैन्य व दुःखी जीवनाचे चित्रण आले आहे. पाटलाच्या शेतीत ऐन सुगीच्या दिवसात गहू तयार करताना गणपतचे दोन्ही हात त्या गव्हाच्या मशीनमध्ये कापले जातात. मजुराचे हात म्हणजे जगणे होय. जीवन होय. परंतू नियतीला जे मान्य असते तिथे माणूस हतबल असतो. गणपतचे दोन्ही हात गेल्यानंतर त्याचे संपूर्ण जीवन उध्दवस्त होते. गणपतच्या करुण कहाणीचे चित्रण कादंबरीकारानी या कादंबरीत केले आहे.

ग्रामीण भागात वाढलेल्या व स्वानुभावातून लेखन करणाऱ्या या ग्रामीण कादंबरीकारांना सर्व प्रकारच्या शोषणातून ग्रामीण समाज मुक्त झाला पाहिजे असे वाटते. औद्योगिकीकरणामुळे आधुनिकीकरणामुळे, भांडवलदारी अर्थव्यवस्थेमुळे आणि लोकशाहीमुळे आज ग्रामीण भागात असंख्य प्रश्न निर्माण झालेले आहेत. ते पाण्यासारखे मूलभूत जसे आहेत तसे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिकही आहेत. या सर्व प्रश्नांनी व्यापलेल्या आजच्या वास्तव्याला सामोरे जाण्याचा प्रयत्न आजच्या तरुण पिढीतील ग्रामीण कांदबरीकार करीत आहेत.

जागतिकीकरणाचा मराठी साहित्यावर परिणाम झाला आहे किंवा नाही? या संदर्भात समीक्षकांनी असमाधान व्यक्त केले आहे. अविनाश सप्रे यांनी 1980 नंतरची मराठी कादंबरी' (खेळ, दिवाळी अंक, 2007) या लेखात जागतिकीकरणाचा मानवी जीवनावर संस्कृतीवर होत असलेला परिणाम समजून घेऊन सृजनशील लेखनात त्याचे रूपांतर करणारा कादंबरीकार दिसत नाही असे म्हटलेले आहे. हरिश्चंद्र थोरात यांनीही गेल्या पंधरावीस वर्षातील मराठी कादंबरीचे स्वरूप (युगांतर, दिवाळी अंक, 2008) या लेखात भोवतालच्या वेगवान परिस्थितील मराठी कादंबरी कशी सामोरी जाते आहे. या प्रश्नाचा वेध घेतला आहे. त्यांच्या मते जागतिकीकरणामुळे आपल्या संस्कृतीवर झालेले आकमण या दृष्टीने पाहिले जाऊ लागले त्यातून भूतकाळ कुरवाळणारे कादंबरीलेखन उत्पन्न झाले. कालबाहय सामाजिक, सांस्कृतिक संरचनांच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केले जात नाहीत. त्याचप्रमाणे कादंबरीकडे जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन असावा लागतो याचीही जाणीव नाही. सप्रे आणि थोरात यांचे असमाधान योग्यच आहे. तथापि येथे विजय तेंडुलकर (कादंबरी 2), श्याम मनोहर (कळ), रंगनाथ पठारे (नामुष्किचे स्वगत), दिनानाथ मनोहर (मन्वंतर), मकरंद साठे (अच्युत आठवले आणि आठवण, ऑपरेशन यमू), राजन गवस (तणकट, कळप, ब-बळीचा), सदानंद देशमुख (तहान, बारोमास), कृष्णात खोत (गावठाण, रौंदाळ, झड-झिंबड, धूळमाती) इत्यादी कादंबरीकार आर्थिक बदलाच्या पार्श्वभूमीवर खेडयातील जगण्यातील स्थित्यंतरे कृषिसंस्कृतीची पडझड, रूढी परंपरामुळे होणारे शोषण, मूल्यांचा -हास सखोल आणि गंभीर अन्वयार्थ मांडू पाहणारे दिसतात. डॉ भालचंद्र नेमाडे म्हणतात त्याप्रमाणे गेल्या दोनतीन दशकांतल्या सामाजिक स्थित्यंतरामुळे झपाटयाने कोलमडू लागलेली समग्र

जीवनव्यवस्था सगळ्या समाजाच्या अंतःस्तरावरच्या सगळ्या जाणिवांनिशी कवेत घेणारी बृहद कादंबरी निर्माण होणे ही काळाची गरज आहे, त्यासाठी समकालीन राहून डोळसपणे केलेल्या सामाजिक व राजकीय निरीक्षणांबरोबरच समाजशास्त्र, इतिहास, मानववंशास्त्र, अर्थशास्त्र, विज्ञान व तंत्रज्ञान इत्यादी पुरक विद्याशाखांचा चिकित्सक अभ्यासही आवश्यक आहे. यातूनच भविष्यात जागतिकीकरणाच्या समग्र परिणामांचा वेध घेणारा एखादा महत्त्वाचा कादंबरीकार मराठीला मिळू शकतो असे म्हणता येईल.

जागतिकीकरणाचा मराठी कादंबरी प्रातिनिधिक स्वरूपात धावता आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेतला आहे. ग्रामीण भागातील दुःख आणि दारिद्रय यांनी पिचलेल्या तळागाळातल्या माणसांचे कण्हणे कादंबरीत ऐकू येवू लागलेले दिसते. सहकार क्षेत्रातील उच्चपदस्थ, शासकीय यंत्रणा व अधिकारी, राजकीय नेते यांचा वावर वाढलेला दिसतो. गावाबाहेरच्या भटक्या जमाती आणि ग्रामीण जीवनाची सूत्रे हाती बाळगणारे सत्ताधारी अशा दोन्ही टोकांकडे यांत्रिकीकरणामुळे कादंबरीचे लक्ष वेधलेले दिसून येते. दुष्काळ, शेतकऱ्यांची आंदोलने, राजकारणाचे बदलते रंग, निवडणूकांच्या चित्तरकथा, नवजागृत समाजाची शिक्षणाची ओढ, नवशिक्षितांची ओढाताण, बेकारी, सहकारक्षेत्रातील भ्रष्टाचार, माणूस आणि माती यांची ओढ जागवून सामूहिक नेणिवेला स्पर्श करणे, ग्रामजीवनातील निसर्गाचे स्थान, परिसर प्राधान्य, नवश्रीमंताकडून होणारे भूमिहीन मजुरांचे शोषण फास्टफूडच्या वाढत्या गर्दीत बर्गर, पिझ्झाचा विकास आणि भाकरीचा विनाश, बदलेले ग्रामीण जीवन, अर्थव्यवहारातील महत्त्वाचे घटक असलेल्या कार्पोरेट कंपन्या, त्यांच्यातील आपापसातील जीवघेण्या स्पर्धा, अनैतिक व्यवहार, आजच्या गुंतागुंतीच्या काळात जगणाऱ्या माणसाच्या दुभंगलेपणाचे आकलन, प्रसारमाध्यमे अशा कितीतरी गोष्टींमुळे जागतिकीकरणाच्या (ग्लोबलच्या) नावाने सामान्य माणूस नागवला जात आहे. अरिष्ठग्रस्त भांडवलशाहीच्या हितसंबंधाने जगाच्या अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करण्याची प्रकिया चालू झाली आहे असे दिसून येते.

थोडक्यात जागतिकीकरणाने नागर ग्रामीण असा भेद न करता एकूण मानव जातीवर परिणाम केला आहे हा परिणाम सकारात्मक पेक्षा नकारात्मक अधिक दिसून येतो. भांडवली व्यवस्थेला पुरक ठरलेल्या जागतिकीकरण सर्वसामान्य माणसांना भरडून काढत आहे. सर्वसामान्य माणूस दृष्ट राजकारणाचा बरी कसा होतो याचा चित्र देशद्रोही कादंबरी करते तर भांडवली व्यवस्थेला अधिक बळ पुरवणारी सेज ही संकल्पना कुटुंब समाजाने कृषी संस्कृतीला उत्कृष्ट करते याचे वर्णन शंकर सकाराम यांची कादंबरी करते हे बेरोजगारीचा बळी ठरलेल्या तरुण भविष्यात बाप होण्याचेच नाकारतो अशी उध्वस्त पणाची स्थिती तरुणांच्या वाटला जागतिकीकरणाच्या परिणामून आलेली आहे याचा प्रत्येक किशोर सानप यांची पांगुळवाडी ही कादंबरी देते दुःख देण्यास दारिद्र्य आणि नैराश्याने ग्रासलेले

सर्वसामान्य ग्रामीण माणूस भांडवली व्यवस्थेचा वही ठरला कुटुंब व्यवस्थेचे झालेले पतन पती-पत्नीच्या नात्यात आलेल्या दुरावा शेतकऱ्यांचे होत असलेल्या आर्थिक शोषण बेरोजगार तरुणांची मानसिक आणि आर्थिक कुचंबना होणारी घुसमट या सर्वांचे दर्शन वरील कादंबरीतून घडते जागतिकीकरणाची व्यवस्था आणि ग्रामव्यवस्थेची मूल्यवस्था या दोन भिन्न व्यवस्थेचा संघर्ष येथे दिसतो ग्रामव्यवस्थेची मूल्यवस्था ही समूह भाऊ सह अनुभवयाची आहे तर जागतिकीकरणात कमालीची व्यक्ती केंद्र येताना दिसते याचे चित्र मराठी ग्रामीण कादंबरीतून आले आहे.

**निष्कर्ष:**

1. जागतिकीकरणाचे संदर्भ शोधण्यासाठी बारोमास तहान देशोधडी या मराठी ग्रामीण कादंबऱ्या महत्त्वाच्या आहेत.
2. जागतिकीकरणाच्या प्रभावातून जन्माला आलेल्या सेज या प्रक्रियेमुळे मानवी जीवनात निर्माण झालेले गुंतागुंत एसई झेड पांगुळवाड्या ग्रामीण कादंबऱ्यांनी प्रभावीपणे चित्रीत केली आहे.
3. जागतिकीकरणाने नवीन शोषण व्यवस्थेला जन्माला घातले आहे याचा प्रत्यय आगळ मधून येतो.
4. जागतिकीकरण खेड्यापाड्यातील शेताच्या बांधापर्यंत येऊन पोहोचले याचा प्रत्यय बारोमास मधून येतो.
5. भांडवली व्यवस्थेने शेतकऱ्याला निर्णय व्यवस्थेच्या परिघा बाहेर ठेवले.
6. जागतिकीकरणाच्या प्रभावातून उदयाला आलेल्या चंगळवादी भोगवादी सुखलोलुप प्रवृत्तीने ग्रामीण मनाचा कब्जा घेतला याचा प्रत्येक तहान मधून येतो.
7. जागतिकीकरणाने एकूणच मानवी नातेसंबंधावर खोलवर प्रहार केला आणि अधिक व्यवहारी माणूस अधिक व्यवहारी बनला भांडवली व्यवस्थेने माणसाला ग्राहक बनविले याचा प्रत्यय पांगुळवाडा एसई झेड देशोधडी आदि कादंबरीतील चित्रणातून पाहायला मिळतो.